# आजीचे देव दर्शन

रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# आरती परिक्षा देवीची

जय देवी जय देवी जय परिक्षाबाई गे परिक्षा ताई

तुझे दर्शनमात्रे मन बावरूनी जाई जयदेवी जय देवी ॥१॥

मराठीचा पेपर पडता हातात

माझे डोळे ताई पांढरे होतात

विचार करतो पण मज सुचेना काही ॥१॥तुझे दर्शनमात्रे

वाटे उद्या हिंदी पेपर असेल बरा

पेपर पाहताच उतरे चेहरा

कॉपी करणेसाठी मन धाव घेईना ॥२॥तुझे दर्शनमात्रे

इंग्लीश गणित तर महा चांडाळ

पेन ठेवोनी जपावी माळ

इकडे तिकडे मन मग होइ प्रवाही ॥३॥तुझे दर्शनमात्रे

भूगोल सायन्सची मज होती आशा

पण शेवटी पदरी पडली निराशा

निराशेत मग झोप ना येई ॥४॥तुझे दर्शनमात्रे

पाव ताई तुला नारळ फोडिन

नाहीतर तुझ्यास्तव डोके झोडिन

हाक दीन भक्ताची ऐक तु आई ॥५॥तुझे दर्शनमात्रे